पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १२**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २३/६/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २३५**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/५/२०२० ते दि.३१/५/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/९०१ दि.१२/६/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २३६**

मा.सौ.वैशाली बनकर यांचे दि.१८/६/२०२० चे पत्र.

राज्य शासनाने माजी सैनिकांसाठी त्यांच्या घराची कर आकारणी माफ केली असून आपणही शासनाच्या आदेशानुसार पुणे शहराच्या हद्दीमध्ये राहणाऱ्या सर्व माजी सैनिकांना कर आकारणी तातडीने माफ करावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २३७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१६ ते दि.२९ फेब्रुवारी २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/१२७ दि.१२/६/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २३८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१ ते दि.१५ फेब्रुवारी २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/१२८ दि.१२/६/२०२० चे पत्र.

**संकीर्ण**

**विषय क्र. २३९**

सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, श्री.छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राजीव गांधी इ–लर्निंग स्कूल व नी.वा.किंकर रात्र प्रशाला या शाळांसाठी एकूण २८५ शिक्षक व ८ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ११ महिने कालावधीसाठी मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने करार पध्दतीने एकवट मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रशासकीय अधि.शिक्षण मंडळ/१३० दि.१६/६/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४०**

कोविड–१९ ची रोगराईमुळे तसेच अन्य कारणामुळे दि. ३१/०३/२०२० अखेर पर्यन्त झालेल्या कामांची/आदा न केलेल्या बिलांकरिता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दि. २८/०४/२०२० अन्वये दि.३०/०५/२०२० अखेर पर्यन्त दिलेल्या मुदतवाढी मध्ये प्राप्त झालेली सन २०१९–२०२० च्या अर्थसंकल्पातील ज्या भांडवली व विकास कामांची देयके प्राप्त झाली आहे अशी बिले अदा करण्यासाठी सन

२०२०–२१ च्या अंदाजपत्रकामधून तरतूद उपलब्ध करुन देणेस व अशा कामांची देयके अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कपात करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि.१६/६/२०२० चे पत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य खाते– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.३७५.६० कोटी | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या संबंधीत मुख्य खात्याच्या भांडवली तरतूदीमधून करावी. |
| २) | ' स ' यादी– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.२९७.१३ कोटी | अ) सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकातील भांडवली ''स'' यादीच्या तरतूदीतून सरसकट सर्व मा.सभासदांच्या ''स'' यादीला २५ टक्के कपात **किंवा**<br>ब) ज्या मा. सभासदाच्या कामांची देयके आदा करावयाची आहेत . त्याच मा. सभासदांच्या सन २०२०–२१च्या अंदाजपत्रकातील भांडवली ''स'' यादी मधुन |

**विषय क्र. २४१**

पुणे, पेठ बाणेर स.नं. ५२/१/२ येथील प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने आरक्षित ९८७.२५ चौ.मी. जागेचा टी.डी.आर. देणेपोटी मालमत्ता व व्यवस्थापन या विभागामार्फत दि.२१/५/२०१८ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या क्षेत्राची, तडजोडीने ताब्याची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने चालू असलेल्या सदर भूसंपादनातील (एलए-६०३) प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने अर्जदार यांचे मिळकतीमधील आरक्षित १००० चौ.मी. क्षेत्र भूसंपादन कार्यवाहीतुन वगळणेबाबत व तेवढया क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांना कळविणेत येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भुसंपादन व व्यवस्थापन/१३४ दि. १६/६/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४२**

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रस्तावांना प्रिमियम शुल्क टप्प्यामध्ये खालीलप्रमाणे भरण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेस

अ) ७० मी. पेक्षा कमी उंची असलेल्या इमारतींकरिता ३३%, ३३%, ३४% रक्कमेचे ३ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत

ब) ७० मी. किंवा ७० मी. पेक्षा जास्त उंची असलेल्या इमारतींकरिता २५%, २५%, २५%, २५% रक्कमेचे ४ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या व ३६ व्या महिन्यांत

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास
५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास
६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस
७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.